सुरक्षा रक्षक मंडळात सुरक्षा रक्षकांची
ऑनलाईन नोंदणी करण्यासाठी संगणक
आज्ञावली विकसित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्रमांक: एसजीए-२०१७/प्र.क्र.९९/कामगार-५,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : १० ऑक्टोबर, २०१८

वाचा:-

१. शासन निर्णय क्रमांक एसजीए-१५२००१/(७४/७)कामगार-५,दिनांक ९ मे, २००२
२. शासन निर्णय क्रमांक एसजीए-१५२००५/(२३२/६)कामगार-५,दिनांक १९ जून, २००६
३. शासन निर्णय क्रमांक एसजीए-१५२००९/प्र.क्र.१५८८/कामगार-५,दिनांक २ मार्च, २००९
४. शासन निर्णय क्रमांक एसजीए-१५१०/प्र.क्र.२३९४/कामगार-५,दिनांक २५ ऑगस्ट, २०१०
५. शासन निर्णय क्रमांक एसजीए-१५१०/प्र.क्र.२३९४/कामगार-५,दिनांक १७ ऑक्टोबर, २०१३
६. शासन निर्णय क्रमांक एसजीए-२०१७/प्र.क्र.९९/कामगार-५,दिनांक १४ मार्च २०१७
७. मा. मुंबई उच्च न्यायालयाचे रिट याचिका क्र २९३९/२०१६ संदर्भातील दि.८ फेब्रुवारी, २०१७ चे आदेश.
८. मा.मुंबई उच्च न्यायालय याचिका क्र.९३१/२०१८ संदर्भातील दि. १९ सप्टेंबर, २०१८ रोजीचे न्यायालयीन आदेश.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक ( नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ आणि त्या अंतर्गत योजना (सुधारणा) २००२ मधील तरतुदीनुसार राज्यातील सुरक्षा रक्षकांच्या नोकरीचे नियमन व त्यांच्या कल्याणासाठी सदर कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यात सुरक्षा रक्षक मंडळे स्थापन करण्यात आली आहेत. सदरहू सुरक्षा रक्षक मंडळात सुरक्षा रक्षकांची नोंदणी मंडळाने योजना (सुधारित) २००२ प्रमाणे करणे अभिप्रेत आहे. सुरक्षा रक्षक नोंदणी प्रक्रियेबाबत मा. मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका क्रमांक २९३९/२०१६ दाखल झाली आहे. सुरक्षा रक्षकांच्या नोंदणीचे प्रक्रिया कालबध्द पध्दतीने विहित नियमानुसार, पारदर्शकपणे व जलदरित्या व्हावी यास्तव संगणीकृत ऑनलाईन प्रक्रिया विकसित करण्याचे निर्देश मा. उच्च न्यायालयाने दिनांक ८ फेब्रुवारी, २०१७ रोजी दिले आहेत. त्यानुसार माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या सहमतीने "ई-महापरीक्षा पोर्टलद्वारे" दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार नोंदणी करण्याचा निर्णय घेण्यात आला. तथापी, ई-महापरीक्षा पोर्टलद्वारे सुरक्षा रक्षकांच्या शारिरीक चाचणी व मैदानी परिक्षा घेणे ही सेवा माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या कामाच्या व्याप्तीमध्ये

(Scope of Work) नसल्यामुळे व पर्यायाने ही सेवा कामगार विभागास उपलब्ध करुन देऊ शकत नसल्याबाबत सदर विभागाने स्पष्ट केले आहे. त्याचबरोबर या संदर्भातील आवश्यक तो निर्णय प्रकल्प अंमलबजावणी समितीसमोर जाऊन नियमानुसार घेण्याचे अभिप्राय दिलेले आहेत. याचबरोबर मा. उच्च न्यायालय, याचिका क्र.९३१/२०१८ मध्ये मा. मुंबई उच्च न्यायालय यांनी दि.१९/०९/२०१८ रोजी सुरक्षा रक्षक ऑनलाईन नोंदणी प्रणाली एक महिन्याच्या आत विकसित करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. या सर्व बाबी विचारात घेता सुरक्षा रक्षकांची ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करण्याकरिता व त्यासंदर्भातील संगणक प्रणाली विकसित करण्यासाठी तज्ञ संस्थांकडून सुरक्षा रक्षक मंडळ, बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा या मंडळाने विहित ई-निविदा कार्यपध्दती राबविल्यानुसार व याबाबतच्या कामगार आयुक्त यांनी संदर्भाधिन दिनांक २०/०८/२०१८ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावावर प्रधान सचिव (कामगार) यांचे अध्यक्षतेखाली प्रकल्प अंमलबजावणी समितीसमोर सादरीकरण करण्यात आले. या सादरीकरणानुसार ई-निविदा प्रक्रियेमध्ये पात्र ठरलेल्या तज्ञ संस्थेस सुरक्षा रक्षकांची नोंदणी ऑनलाईन पध्दतीने करण्यासंदर्भात शासनाने आता खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

१) राज्यातील सर्व सुरक्षा रक्षक मंडळांनी मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक ८ फेब्रुवारी २०१७ च्या आदेशातील निर्देशाप्रमाणे मंडळांत सुरक्षा रक्षकांची ऑनलाईन नोंदणी करणे अनिवार्य आहे. याकरिता सुरक्षा रक्षकांच्या नोंदणी करण्याच्या कार्यपध्दती संदर्भातील यापूर्वी निर्गमित केलेले सर्व शासन निर्णय व अस्तित्वातील इतर शासन आदेश अधिक्रमित करण्यात येत आहे.

२) सुरक्षा रक्षकांची ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करण्याकरिता आयुक्त, कामगार यांच्या दिनांक २०/०८/२०१८ च्या प्रस्तावास शासन मान्यता देण्यात येत आहे. ई-निविदा प्रक्रियेत पात्र ठरलेल्या मे. सेराईज टेक सोल्युशन्स प्रा.लि., प्रिस्टन वूडस् २९/ए, न्यू डी.पी. रोड, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११ ०२७ या तज्ञ संस्थेमार्फत बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा या व इतर सर्व जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाकरिता सुरक्षा रक्षकांची संगणक प्रणाली विकसित करुन ती त्वरेने विहित मुदतीत कार्यान्वित होणे आवश्यक असल्याने कामगार आयुक्त कार्यालय, बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा

सुरक्षा रक्षक मंडळ या सर्व प्रक्रियेचे जबाबदारीने समन्वय करेल. संगणक आज्ञावली कार्यान्वित झाल्याचा पूर्तता अहवाल त्वरीत शासनास सादर करण्यात यावा.

३) मे. सेराईज टेक सोल्युशन प्रा.लि या संस्थेने संगणक आज्ञावली विकसित करुन ती त्वरीत कार्यान्वित करण्यासाठी सर्व जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळांनी उक्त संस्थेशी सेवा करार करुन अंतिम केलेल्या मसुद्यात कार्यादेश द्यावेत.

४) संगणक प्रणाली त्वरेने म्हणजेच विहित मुदतीत दिनांक १९/१०/२०१८ पूर्वी कार्यान्वित होणे आवश्यक असल्यामुळे या सर्व प्रक्रियेचे समन्वय कामगार आयुक्त कार्यालयामार्फत करण्यात यावे व यासाठी सेवा करार व कार्यादेशाचा मसुदा अंतिम करेल.

५) सर्व मंडळांनी महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक ( नोकरीचे नियमन व कल्याण) योजना २००२ मधील खंड १३ (१), (२) व (३) मधील तरतुदीनुसार, मुख्य मालक, मालक एजन्सी यांची नोंदणी देखील ऑन लाईन पध्दतीने करावी व त्यासाठी योजनेचा खंड १७ नुसार प्रति अर्जासाठी रु.१०००/- इतके शुल्क आकारण्यात यावे.

६) सर्व सुरक्षा रक्षक मंडळांनी उक्त तज्ञ संस्थेमार्फत सुरक्षा रक्षकांची ऑनलाईन पध्दतीने नोंदणी होण्याकरिता, तसेच मुख्य मालक, मालक एजन्सी व सुट प्राप्त सुरक्षा रक्षक यांचे नोंदणीचे अर्ज ऑनलाईन स्विकारुन त्याबाबतची नमूद केलेली आवश्यक कार्यवाही पूर्ण करण्याकरिता सदर संस्थेस कार्यादेश (Work Order) देणे किंवा याबाबत त्यांच्या सेवा घेण्याबाबत त्यांच्याशी कंत्राट/ सामंजस्य करार (MOU) करणे आवश्यक राहील. जेणेकरुन तज्ञ संस्थेकडून घेण्यात येणा-या सेवेबाबत अटी व शर्ती स्पष्ट करणे आवश्यक राहील. सेवा देण्यावरुन किंवा सेवेचा मोबदला देण्यावरुन काही विवाद उपस्थित झाल्यास करारातील अटी व शर्तीनुसार कार्यवाही करणे शक्य होईल. या कार्यवाहीकरिता कामगार आयुक्त सर्व प्रक्रियेचे जबाबदारीने समन्वय करतील.

७) मे. सेराईज टेक सोल्युशन प्रा.लि या संस्थेला सुरक्षा रक्षकांच्या नोंदणीकरिता प्रती अर्ज रु.५०/- दर देण्यास मान्यता आहे.

८) सुरक्षा रक्षक मंडळास अर्जदाराची शारीरिक चाचणी व मैदानी परिक्षा घ्यावयाची असल्याने मंडळास परिक्षेकरिता मैदान भाडयाने घेणे, तसेच जिल्हाधिकारी, संचालक, क्रिडासंचालनालय इ. कडून शारिरीक चाचणी व मैदानी परिक्षा घेण्यात येणार असल्याने त्यांच्याकडून नियुक्त अधिकारी

/ कर्मचारी यांना देखील काही मोबदला त्यांच्या सेवेकरिता मंडळास देणे आवश्यक राहील. त्यामुळे सदर खर्च भागविण्याकरिता खुल्या प्रवर्गातील अर्जदाराकडून रु.५०/- व मागासवर्गीय प्रवर्गातील अर्जदाराकडून रु.२५/- एवढे शुल्क आकारण्यात येत आहे. अशा प्रकारे उक्त तज्ञ संस्थेने अर्जदाराकडून एकत्रित खुल्या प्रवर्गातील उमेदवाराकडून त्यांच्या सेवेचा मोबदला म्हणून रु ५०/- + कर आणि मंडळाकरिता रु.५०/- अशी एकूण रु १००/- एवढी रक्कम व + टॅक्स ई-पेमेंटद्वारे स्विकारावी व मागास वर्गीय प्रवर्गातील अर्जदारांकडून त्यांच्या सेवेचा मोबदला म्हणून रु.५०/- + कर आणि मंडळाकरिता रु. २५/- अशी एकूण रु ७५/- एवढी रक्कम व +टॅक्स ई-पेमेंटद्वारे स्विकारावी आणि त्यातील त्यांचे सेवा शुल्क वगळून उर्वरीत रक्कम मंडळाकडे वर्ग करावी. याशिवाय पात्र ठरलेल्या उमेदवारांनी सुरक्षा रक्षक मंडळात [मंडळाच्या संकोषात (पूल मध्ये)] नोंदणी होण्याकरिता मंडळाने विहित केलेल्या नमुना- ब (फॉर्म बी) मध्ये माहिती भरुन नोंदणी शुल्क रु १००/- जमा करणे आवश्यक आहे. सदर रु १००/- नोंदणी फी देखील तज्ञ संस्थेने पात्र सुरक्षा रक्षकांचा नोंदणीकरिता ऑनलाईन अर्ज (फॉर्म बी) स्विकारण्याच्या वेळेस घ्यावी व ०३ दिवसाच्या आत सदर रक्कम मंडळाकडे वर्ग करावी.

९) मे. सेराईज टेक सोल्युशन प्रा.लि सर्व शुल्क ई-पेमेंट गेट वे द्वारा एकत्रित जमा करेल व स्वत:चे प्रती अर्ज शुल्क वजा करुन मंडळाचे शुल्क दर पंधरवडयात संबंधित मंडळाकडे जमा करेल. तसेच या कार्यवाहीचा जमा लेख्याचा संगणकीकृत ताळमेळ मे. सेराईज टेक सोल्युशन प्रा.लि तसेच संबंधित मंडळामार्फत अद्ययावत ठेवला जाईल.

१०) मे. सेराईज टेक सोल्युशन प्रा.लि. या संस्थेस ऑनलाईन प्रोसेसिंग चार्जेस, संगणक प्रणालीकरिता लागणारे सर्व चार्जेस व संगणक प्रणाली क्लाऊडवर ठेवण्याकरिता ऑनलाईन चार्जेस व डेटाएन्ट्री चार्जेस इ. बाबत कामगार आयुक्त यांनी दिनांक २०/०८/२०१८ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावानुसार शुल्क आकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

हा शासन निर्णय महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक ( नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ च्या कलम ८(४) अन्वये तसेच माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

११) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८१०१०१६५६४३३२१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dr.Shrikant L. Pulkundwar

Digitally signed by Dr Shrikant L Pulkundwar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, [illegible]
cn=Dr Shrikant L Pulkundwar
Date: 2018.10.11 11:47:07 +05'30'

( डॉ.श्रीकांत ल.पुलकुंडवार )
शासनाचे उप सचिव

प्रत माहितीसाठी अग्रेषित:-

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव (पत्राने )
२. मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय,मंत्रालय,मुंबई
३. मा.मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,
४. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, अ-६, मंत्रालय समोर,नरिमन पॉईट, मुंबई,
५. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानभवन, मुंबई,
६. मा.राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
७. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
८. अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण आणि क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
९. प्रधान सचिव (कामगार), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई-३२,
१०.प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहाय्यक, मुंबई,
११.सर्व जिल्हाधिकारी
१२.कामगार आयुक्त, कामगार भवन, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा, मुंबई,
१३.सर्व सह सचिव/ उप सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
१४.सह कामगार आयुक्त, कामगार भवन, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा, मुंबई,
१५.कामगार उप आयुक्त, कामगार भवन, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा, मुंबई
१६.माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
१७.अध्यक्ष, सर्व माथाडी मंडळे/ सुरक्षा रक्षक मंडळे
१८. सर्व अवर सचिव /कार्यासन अधिकारी, कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई,
१९.मे. सेराईज टेक सोल्युशन प्रा.लि., प्रिस्टन वुडस्, २९/ए, न्यू डी.पी रोड, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११ ०२७.
२०.निवड नस्ती (कामगार-५).